सकाळ

# आळे येथील विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा अभियानासाठी निवड

**आळेफाटा, ता. ८ :** आळे (ता. जुन्नर) येथील बाळासाहेब जाधव महाविद्यालयातील क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानासाठी विद्यार्थ्यांची सायबर वॉरिअर्स म्हणून निवड झाली आहे. बीसीए-बीसीएस विभागातील २० विद्यार्थ्यांची निवड महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात झाली.

हे विद्यार्थी पुढील आठ आठवडे परिसरातील शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध सामाजिक घटक आदींमध्ये जाऊन सायबर सुरक्षेबाबत



**आळे (ता. जुन्नर) :** सायबर शिक्षा फॉर सुरक्षा अभियानासाठी निवड झालेले विद्यार्थी आणि इतर मान्यवर.

जनजागृती करण्याचे काम करणार आहेत. बीसीए-बीसीएस विभागाच्या साक्षी नेरकर, मोहिनी जगताप, ऋतू नेहरकर, शोएब शेख विद्यार्थ्यांची यापूर्वी क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झाली आहे.

''या प्रकल्पात यशस्वी काम करून सामाजिक दातृत्व व व्यक्तिमत्त्व विकास साधून विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी केले.

तसेच, हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी फाउंडेशनचे असोसिएट डायरेक्टर अजय शिर्के व सी. एस.आर एक्झिक्युटिव्ह गायत्री पवार-केसकर यांचे मार्गदर्शन मिळाले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव डॉ. अर्जुन पाडेकर, खजिनदार अरुण हुलवळे, किशोर कुऱ्हाडे, भाऊ कुऱ्हाडे, बबन सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके, प्रदीप गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे आदी संचालकांनी शुभेच्छा दिल्या. विभागप्रमुख नूतन जोशी, सर्जेराव थोरात, सायली खंडागळे आदींनी आयोजन केले.